भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# –: ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प :–

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग
## कालावधी (दिनांक १५.०१.२०२० ते १९.०१.२०२०)

| अंक ४/२०२० | दिनांक १४.०१.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (०८/०१/२०२० ते १४/०१/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १५/०१/२०२० ते १९/०१/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८/०१ | ०९/०१ | १०/०१ | ११/०१ | १२/०१ | १३/०१ | १४/०१ | दिनांक | १५/०१ | १६/०१ | १७/०१ | १८/०१ | १९/०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३५.० | ३४.५ | ३३.० | ३५.० | ३५.० | ३५.५ | ३५.५ | कमाल तापमान (अं. से) | ३४ | ३४ | ३२ | ३१ | ३३ |
| २१.० | १८.५ | १८.५ | १८.५ | १८.० | १७.० | १८.० | किमान तापमान (अं. से) | २० | १९ | १८ | १८ | १९ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ३ | २ | १ | ० | २ |
| ढगाळ | ढगाळ | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९३ | ९० | ९१ | ९१ | ९३ | ९१ | ९१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८७ | ८३ | ८४ | ६६ | ७१ |
| ४६ | ४५ | ४५ | ४१ | ४५ | ३३ | ४२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४९ | ४६ | ५० | ३४ | ३८ |
| १.७ | १.२ | १.३ | १.५ | १.४ | १.९ | ०.७ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००६ | ००८ | ००६ | ०१० | ००५ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ – वा-याची दिशा | पूर्वे कडून | पूर्वे कडून | पूर्वे कडून | ईशान्ये कडून | पूर्वे कडून |
| दक्षिण | दक्षिण | ईशान्य | ईशान्य | दक्षिण | ईशान्य | ईशान्य | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** येत्या ५ दिवसात जिल्ह्यामध्ये हवामान कोरडे व थंड राहून अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

### हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| वायंगणी भात | रोप | नुकतीच लागवड केलेल्या भात शेतामध्ये सुरुवातीचे ८ ते १० दिवस पाण्याची पातळी २ ते ३ से. मी. ठेवावी. त्यानंतर ५ से. मी. पर्यंत वाढवावी. |
| कुळीथ व चवळी | रोप ते शाखिय वाढ | चवळी, कुळीथ इ. पीकांवर मावा व पाने पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी १५ मि.ली. डायमिथोएट प्रती १० लीटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| कडवा वाल | रोप ते शाखिय वाढ | वाल पिकास पिकाच्या वाढीच्या सर्व अवस्थांमध्ये जमिनीमध्ये ओलावा असणे आवश्यक आहे. पिकाला फुलो-यात असताना आणि दाणे भरण्याच्या काळात पाण्याच्या २ पाळ्या द्यावय़ात. ज्यादा पाण्यामुळे वालाची शाखिय वाढ होते व उत्पन्न घटते.<br>पिक फुलो-यात आल्यावर शेंगा पोखरणा-या अळीच्या नियंत्रणासाठी मॅलेथिऑन २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| भुईमुग, सुर्यफुल व मोहोरी | रोप ते शाखिय वाढ | भुईमुगाची पेरणी केल्यानंतर ३ दिवसांनी हलके पाणी दयावे व त्यानंतर १० ते १२ दिवसाच्या अंतराने पिकाला पाणी दयावे. तसेच सुर्यफुल व मोहोरी पिकाला वेळेवर पाणी दयावे. |
| आंबा | पालवी | पालवीवर मोठ्या प्रमाणावर तुडतुड्यांचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास तुडतुडे, फुलकीडे व खवले किडीच्या नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रिन २.८% प्रवाही (०.९ मिली प्रती १ लीटर पाणी) किंवा थायोमेथॉक्झोन २५% (WDG) (०.१ ग्रम प्रती लीटर पाणी) या किटकनाशकांची फवारणी करावी. आंबा पिकावर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असुन प्रादुर्भाव आढळुन आल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे.<br>जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी येणा-या मोहोरावर फुलकीडीचा (थ्रिप्स) प्रादुर्भाव आढळुन आल्यास अशा ठिकाणी फुलकिडींच्या नियंत्रणासाठी ४५ % स्पीनोसॅड २.५ मिलि प्रति १० लिटर पाण्यातुन संपुर्ण झाडावर फवारावे.<br>विद्यापीठाच्या शिफारशीनुसार मोहोरलेल्या झाडांना फळगळ कमी होउन चांगली फळधारणा होण्यासाठी आम्रशक्ती या विद्राव्य अन्नद्रव्याची १ लि. प्रती २५ लि. पाणी या प्रमाणात फवारणी करावी. सदर २५ लि द्रावण हे चार मोहोरलेल्या झाडांसाठी वापरावे. |
| काजु | मोहोर ते फळधारणा | सदरील वातावरण काजु ढेकण्या किडीच्या प्रादुर्भावासाठी अतिशय पोषक असल्याचे दिसुन आले आहे. पुढील वातावरण काजु ढेकण्या किडीसाठी पोषक असुन शेतक-यांच्या बागेमध्ये मोहोर आहे त्यांना प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मिली प्रति १० लिटर पाण्यातुन व ज्या शेतक-यांच्या बागेमध्ये फलधारणा झालेली असेल त्यांनी लॅम्ब्डासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मिली प्रति १० लिटर पाण्यातुन काजुवरील ढेकण्या किडीच्या नियंत्रणासाठी फवारणी करावी.<br>काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पडलेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजुवरील बोंड व बी पोखरणा-या अळींच्या नियंत्रणासाठी डायक्लोरोव्हॉस ७६% प्रवाही १० मिलि प्रती १० लिटर पाण्यातुन फवारावे. |
| मिरची | फुलोरा | मिरचीवर बोकड्या किंवा चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास रोग नियंत्रणासाठी व रोगकारक किडींच्या उदा. फुलकिडे व पाढरी माशींच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर १५ दिवसांनी फोरेट १० कि./हे. दयावे तसेच डायमिथोएट ३०% प्रवाही १ मिली + गंधक २ ग्रम किंवा मॅन्कोझेब २ ग्रम प्रती लिटर पाण्यात मिसळुन पुर्नलागवडीनंतर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. |
| कलिंगड | फुलोरा ते फलधारणा | वेलवर्गीय भाजीपाला क्षेत्रामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी विद्यापिठाने विकसित केलेले क्यु ल्युर युक्त रक्षक सापळे हेक्टरी चार या प्रमाणात लावावेत. कलिंगडाच्या रोपांवर, वेलिंवर पाने पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी १५ मिलि डायमिथोएट प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात द्रावण तयार करुन फवारणी करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>(०२३६२-२४४२३१) |
|---|---|---|